0 2 AUG 2026

सकाळ



कोल्हापूर : बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना उपस्थित मान्यवर.

# विद्यापीठात बॅरिस्टर खर्डेकर यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती साजरी झाली. विद्यापीठाच्या खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये कुलगुरू डॉ. आर. के. कामत आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते बॅरिस्टर खर्डेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. एस. जी. घाणे, संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. सचिन पाटील, डॉ. शिवराज थोरात, अनिल मातेकर, संध्याराणी पाटील, वंदना गुरव, आनंदा अवघडे, एस. एस. बुवाडवरी यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय सेवक, अधिकारी आणि शिक्षक उपस्थित होते.

0 2 AUG 2026

पुढारी

# विद्यापीठात बॅ. खर्डेकर यांची जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामधील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये कुलगुरू डॉ. आर. के. कामत व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. एस. जी. घाणे, संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. सचिन पाटील, डॉ. शिवराज थोरात, अनिल मातेकर, संध्याराणी पाटील, वंदना गुरव, आनंदा अवघडे, एस. एस. बुवाडवरी उपस्थित होते.

0 2 AUG 2026
पुण्यनगरी




शिवाजी विद्यापीठ येथे लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त अभिवादन करताना मान्यवर.

## शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. एस. जी. घाणे, डॉ. ए. एम. सरवदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. आर. जी. बारवेकर, डॉ. एम. एस. वासवाणी, डॉ. धनंजय सुतार, डॉ. मच्छिंद्र गोफणे, उपकुलसचिव डॉ. विभा अंग्रेदी, डॉ. उत्तम सकट, डॉ. नीलेश बनसोडे, सुरेश बंडगर, सुरेखा आडके, अनिल साळोखे, अरविंद पाटील, बाबूराव तिळणे आदी उपस्थित होते. दरम्यान, विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त, तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. विद्यानंद खंडागळे, रत्नदीप पाटील, रुचिता थरोली, सना शेख, प्रवीण मोरे, शुभम गायकवाड आदी उपस्थित होते.

0 2 AUG 2026

# पुढारी




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. आर. के. कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

## शिवाजी विद्यापीठ

मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. आर. के. कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. एस. जी. घाणे, अध्यासनाचे समन्वयक डॉ. ए. एम. सरवदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. आर. जी. बारवेकर, डॉ. एम. एस. वासवाणी, डॉ. धनंजय सुतार आदी उपस्थित होते.

दरम्यान, विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. विद्यानंद खंडागळे, रत्नदीप पाटील, रुचिता थरोली आदी उपस्थित होते.

02 AUG 2026
तरूण भारत

थोडक्यात

# अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र- कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. एस. जी. घाणे, डॉ. ए. एम. सरवदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. आर. जी. बारवेकर, डॉ. एम. एस. वासवाणी, डॉ. धनंजय सुतार, डॉ. मच्छिंद्र गोफणे, उपकुलसचिव डॉ. विभा अंत्रेडी, डॉ. उत्तम सकट उपस्थित होते. शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रुपाली संकपाळ, डॉ. विद्यानंद खंडागळे, रत्नदीप पाटील उपस्थित होते.

0 2 AUG 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती झाली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. रजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते अण्णा भाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते. शिक्षणशास्त्र अधिविभागात लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त, अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
0 2 AUG 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊंच्या लेखनाचा परीघ मानवतावादी : संजय पाटील

## विद्यापीठात अण्णा भाऊ साठे जयंती; लेखन प्रेरणा दिन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : 'अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाचा समग्र परीघ मानवतावादी आहे,' असे प्रतिपादन नाट्यकर्मी संजय पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती आणि लेखन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. नंदकुमार मोरे अध्यक्षस्थानी होते.

पाटील म्हणाले, 'अण्णा भाऊंना शाळेने अक्षर दिले नाही; पण त्यांनी मात्र मराठी साहित्याला प्रचंड शब्दभांडार दिले. या प्रतिभावंत साहित्यिकाने आपल्या एकूण कथा साहित्यात समाजातील दलित, उपेक्षित, भटके, शहरी, ग्रामीण आणि झोपडपट्टी अशा सर्व घटकांच्या समस्यांचा वेध घेतला. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीला अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याने लेखनबळ दिले. मराठी साहित्याला अपरिचित असलेल्या विश्वाचे दर्शन त्यांनी घडविले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला अण्णा भाऊंच्या लेखणीने प्रेरणा दिली.'




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लोकशाही अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना संजय पाटील. शेजारी डॉ. नंदकुमार मोरे व डॉ. रणधीर शिंदे.

डॉ. मोरे म्हणाले, 'अण्णा भाऊ साठे यांनी विपुल साहित्यनिर्मिती करून पुढील पिढ्यांना लेखन प्रेरणा दिली. त्यांच्या साहित्याची दिग्गज, निर्माता, दिग्दर्शकांना भुरळ पडली. त्यांच्या साहित्यकृतींवर चित्रपटही निघाले. तथापि, मराठी माणसांना अण्णा भाऊ खूप उशिरा समजले. लोकजीवनाला बांधून ठेवणाऱ्या अनेक साहित्य प्रकारांमध्ये त्यांनी आपली लेखणी चालविली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये त्यांनी अतुलनीय योगदान दिले. त्यांचे 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन म्हणजे अभ्यासपूर्ण प्रवासाची दृष्टी कशी असायला हवी, याचा वस्तुपाठ आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा लेखन आदर्श घ्यावा.'

अनिता मिस्कुळ, अमोल देशमुख, विष्णू पावले यांनी मनोगत व्यक्त केले. अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. ज्योती वराळे यांनी सूत्रसंचालन केले. रूपाली पाटील यांनी आभार मानले.

02 AUG 2026
सिंधुदुर्ग समाचार

# थोडक्यात वाचा

## अण्णा भाऊसाठे यांच्या लेखनाचा परीघ मानवतावादी : संजय पाटील

कोल्हापूर/प्रतिनिधी :

अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाचा समग्र परीघ मानवतावादी आहे, असे प्रतिपादन प्रख्यात कवी, नाट्यकर्मी व सिने-दिग्दर्शक संजय कृष्णाजी पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती व लेखन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. नंदकुमार मोरे अध्यक्षस्थानी होते.

पाटील म्हणाले, अण्णाभाऊंना शाळेने अक्षर दिले नाही, पण त्यांनी मात्र मराठी साहित्याला प्रचंड शब्दभांडार दिले. या प्रतिभावंत साहित्यिकाने आपल्या एकूण कथासाहित्यात समाजातील दलित, उपेक्षित, भटके, शहरी, ग्रामीण आणि झोपडपट्टी अशा सर्व घटकांच्या समस्यांचा वेध घेतला. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीला अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याने लेखनबळ दिले. मराठी साहित्याला अपरिचित असलेल्या विश्वाचे दर्शन त्यांनी घडविले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला अण्णा भाऊंच्या लेखणीने प्रेरणा दिली.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. मोरे म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांनी विपुल साहित्य निर्मिती करून पुढील पिढ्यांना लेखन प्रेरणा दिली. त्यांच्या साहित्याची दिग्गज निर्माता दिग्दर्शकांना भुरळ पडली. त्यांच्या साहित्यकृतींवर चित्रपटही निघाले, तथापि, मराठी माणसांना अण्णा भाऊ खूप उशीरा समजले. लोकजीवनाला बांधून ठेवणाऱ्या अनेक साहित्यप्रकारांमध्ये त्यांनी आपली लेखणी चालवली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये त्यांनी अतुलनीय योगदान दिले. त्यांचे 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवास वर्णन म्हणजे अभ्यासपूर्ण प्रवासाची दृष्टी कशी असायला हवी, याचा वस्तुपाठ आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा लेखन आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अनिता मिस्कूळ, अमोल देशमुख आणि विष्णू पावले यांनी मनोगते व्यक्त केली. अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. ज्योती वराळे यांनी सूत्रसंचालन केले, तर रूपाली पाटील यांनी आभार मानले.

0 2 AUG 2026
जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बी. ए. भाग ३ ची १६ पुस्तके प्रकाशित

## कुलगुरू प्रा. डॉ. कामत यांच्या हस्ते प्रकाशन : इतिहास अभ्यास मंडळाकडून निर्मिती



**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाने बी. ए. भाग ३ च्या अभ्यासक्रमासाठी तयार केलेली पाच दूरस्थ अभ्यासक्रमाची आणि अकरा क्रमिक अभ्यासक्रमाची अशी एकूण १६ पुस्तके प्रकाशित केली. या पुस्तकांचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते केले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. चंद्रवर्धन नाईक, इतिहास अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. अवनीश पाटील, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, अभ्यास मंडळ विभागाच्या श्रीमती संध्या अडसुळे, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव विनय शिंदे, दिलीप मोहाडिकर, दीपक काशिद तसेच विविध पुस्तकांचे संपादक, लेखक उपस्थित होते.

**प्रकाशित साहित्य बी.ए. भाग ३, सत्र ५ व ६ : इतिहास क्रमिक पुस्तके**

स्थानिक इतिहास : संकल्पना आणि पद्धती, कोल्हापूरचा वारसा, आधुनिक जगाचा इतिहास, स्थानिक इतिहासाचे उपयोजन, मध्ययुगीन भारताचा इतिहास, प्राचीन भारताचा इतिहास, इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह, इतिहास लेखनाची तंत्रे यांसह एकूण ११ पुस्तके प्रकाशित केली.

**इतिहास दूरस्थ अभ्यासक्रमाचे स्वयंअध्ययन साहित्य**

इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह, इतिहासलेखनाची तंत्रे, प्राचीन भारताचा इतिहास, आधुनिक जगाचा इतिहास, मध्ययुगीन भारताचा इतिहास आणि मराठा साम्राज्याचा उदय व दृढीकरण या विषयांची एकूण ५ पुस्तके प्रकाशित केली.

**वेळेत अभ्याससाहित्य उपलब्ध**

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले की, प्रवेश प्रक्रिया सुरू असतानाच विद्यार्थ्यांना दूरस्थ आणि क्रमिक अभ्यासक्रमांची पुस्तके उपलब्ध करून देणे ही महत्त्वाची बाब आहे.

02 AUG 2026

सिंधुदुर्ग - समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गणित आणि संख्याशास्त्रामध्ये 'ए आय'चा पाया : कुलगुरू कामत

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया हा गणित आणि संख्याशास्त्रामध्ये असून विद्यार्थी आणि शिक्षकांनी या संदर्भातील मूलभूत संकल्पना भक्कम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि सेंटर फॉर एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट (CoEAISD) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधान मंत्री उच्चतर शिक्षण अभियान या योजनेअंतर्गत 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग' (Artificial Intelligence and Machine Learning) या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरू डॉ. कामत बोलत होते. संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी प्राध्यापक डॉ. एस. आर. कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, संख्याशास्त्र विषयाच्या विद्यार्थी आणि शिक्षकांकडे कृत्रिम बुद्धिमत्तेमागील गणितीय व सांख्यिकीय तत्त्वे समजून घेण्याची क्षमता असते. त्याद्वारे त्यांनी मूलभूत संकल्पनांवर प्रभुत्व मिळवून आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आत्मसात करावे. संख्याशास्त्र अधिविभाग आणि सेंटर फ़ॉर एक्सलन्सने कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग क्षेत्रात केलेल्या सातत्यपूर्ण कार्याचे, अभ्यासक्रम विकासाचे आणि शिक्षक प्रशिक्षण उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

डॉ. एस. आर. कुलकर्णी म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अत्यंत गतीने बदल होत आहेत. ते समजून घेणे आवश्यक आहे. या झपाट्याने घडणाऱ्या घडामोडींचा आढावा घेत शिक्षकांनी सतत अद्ययावत ज्ञान आत्मसात करावे. विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत संकल्पनांची भक्कम पायाभरणी करून त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी प्रास्ताविक केले. अंजली मंगोरे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. एस. व्ही. राजगुरू यांनी आभार मानले.

या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील संख्याशास्त्र विषयाचे शिक्षक तसेच संख्याशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी सहभागी झाले.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या विविध पैलूंवर डॉ. एस. आर. कुलकर्णी, वारणा विद्यापीठाचे कुलगुरू तथा शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, श्री. एस. ई. परिट, डॉ. एस. एस. सुतार, डॉ. एस. व्ही. राजगुरू आणि डॉ. एस. डी. पवार यांनी मार्गदर्शन केले. आर सॉफ्टवेअरच्या माध्यमातून मशीन लर्निंग तंत्रांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. संजय गंजावे, डॉ. सचिन पाटील, डॉ. कुंदन कोंडके, प्रसेनजित कांबळे, शुभम पाटील, संजय पाटील, अमोल चव्हाण आणि डॉ. उल्का दिंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

0 2 AUG 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गणित आणि संख्याशास्त्रामध्ये 'एआय'चा पाया

## कुलगुरू डॉ. कामत : शिवाजी विद्यापीठात एआय व मशीन लर्निंगविषयक प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन

**जनप्रवास : कोल्हापूर**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया हा गणित आणि संख्याशास्त्रामध्ये असून विद्यार्थी आणि शिक्षकांनी या संदर्भातील मूलभूत संकल्पना भक्कम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि सेंटर फॉर एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान या योजनेअंतर्गत "कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग" या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला. त्यावेळी उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरू डॉ. कामत बोलत होते. संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी प्राध्यापक डॉ. एस. आर. कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, संख्याशास्त्र विषयाच्या विद्यार्थी आणि शिक्षकांकडे कृत्रिम बुद्धिमत्तेमागील गणितीय व सांख्यिकीय तत्त्वे समजून घेण्याची क्षमता असते. त्याद्वारे त्यांनी मूलभूत संकल्पनांवर प्रभुत्व मिळवून आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आत्मसात करावे. संख्याशास्त्र अधिविभाग आणि सेंटर फॉर एक्सलन्सने कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग क्षेत्रात केलेल्या सातत्यपूर्ण कार्याचे, अभ्यासक्रम विकासाचे आणि शिक्षक प्रशिक्षण उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.




**शिवाजी विद्यापीठात आयोजित एआय व मशीन लर्निंगविषयक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्‌घाटन सत्रात मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत. मंचावर डॉ. सोमनाथ पवार, डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. राजगुरू आणि डॉ. एस.आर. कुलकर्णी.**

संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी प्रास्ताविक केले. अंजली मंगोरे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. एस. व्ही. राजगुरू यांनी आभार मानले. या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील संख्याशास्त्र विषयाचे शिक्षक तसेच संख्याशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी सहभागी झाले.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या विविध पैलूंवर डॉ. एस. आर. कुलकर्णी,वारणा विद्यापीठाचे कुलगुरू तथा शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, एस. ई. परिट, डॉ. एस. एस. सुतार, डॉ. एस. व्ही. राजगुरू आणि डॉ. एस. डी. पवार यांनी मार्गदर्शन केले. आर सॉफ्टवेअरच्या माध्यमातून मशीन लर्निंग तंत्रांची प्रात्यक्षिके सादर केली.

0 2 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गणित, संख्याशास्त्रात 'एआय'चा पाया : कुलगुरू डॉ. कामत

कोल्हापूर, ता. १ : 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया हा गणित आणि संख्याशास्त्रामध्ये असून, विद्यार्थी आणि शिक्षकांनी यासंदर्भातील मूलभूत संकल्पना भक्कम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि सेंटर फॉर एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटतर्फे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान योजनेंतर्गत 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग' यावर दोनदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम झाला. डॉ. एस. आर. कुलकर्णी प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, 'संख्याशास्त्र विषयाच्या विद्यार्थी आणि शिक्षकांकडे कृत्रिम बुद्धिमत्तेमागील गणितीय व सांख्यिकीय तत्त्वे समजून घेण्याची क्षमता असते. त्याद्वारे त्यांनी मूलभूत संकल्पनांवर प्रभुत्व मिळवून आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आत्मसात करावे.'

डॉ. कुलकर्णी म्हणाले, 'कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात गतीने होत असलेले बदल समजून घेणे आवश्यक आहे.' कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या विविध पैलूंवर वारणा विद्यापीठाचे कुलगुरू तथा शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, श्री. एस. ई. परीट, डॉ. एस. एस. सुतार, डॉ. एस. व्ही. राजगुरू आणि डॉ. एस. डी. पवार यांनी मार्गदर्शन केले. संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी स्वागत केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 2 AUG 2026

क्रांतिसिंह

# क्लायमेट सत्याग्रह जनतेच्या माध्यतातून पुढे जाणे आवश्यक



कोल्हापूर(प्रतिनिधी):- क्लायमेट सत्याग्रह जनतेच्या माध्यतातून पुढे जाणे आव श्यक आहे. सध्या मनुष्य वापरत असलेले पृथ्वीवरील संसाधनांचे प्रमाण निम्मे करणे गरजेचे आहे. याकरिताच मक्लायमेट सत्याग्रहफ करणे आवश्यक आहे, असे प्रतिपा दन सोलर मॅन ऑफ इंडिया, एनर्जी स्वराजचे फाऊंडर प्रा.चेतन सिंह सोलंकी यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, द इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनियर्स आणि युआन यांच्या संयुक्त विद्यमाने भारत क्लायमेट सत्याग्रह यात्रा अंतर्गत राजर्षी शाहू सभागृहामध्ये हवामान जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा.सोलंकी प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.राजनीश कामत उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांची विशेष उपस्थिती होती.

प्रा.सोलंकी पुढे बोलताना म्हणाले, जागतिक तापमान सातत्याने वाढत असून उन्हाळ्यात उष्णतेच्या तीव्र लाटा निर्माण होत आहेत. हवामानाचे चक्र बिघडल्यामुळे अनपेक्षित ठिकाणी मुसळधार पाऊस आणि पूर येण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. अनेक भागात पावसाचे प्रमाण कमी होऊन तीव्र दुष्काळ पडत आहे. तसेच, जंगलांना अचानक आग लागण्याच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. बदलत्या हवामानामुळे पिकांचे अतोनात नुकसान होत असून जगभरात अन्नटंचाई आणि कुपोषणाचा धोका निर्माण झाला आहे. तापमानवाढीमुळे दोन्ही ध्रुवांवरील हिमनदया वेगाने वितळत आहेत ज्यामुळे समुद्राची पातळी वाढत असून किनारपट्टीची शहरे पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. अतिउष्णता आणि पुरामुळे अनेक साथीचे आजार, श्वसनाचे विकार आणि मानसिक समस्या वाढत आहेत. पृथ्वीवरील सर्वात महत्वाचे घटक पाणी, हवा आणि माती यालाच आपण दुषित करीत आहोत. यामुळे वातावरणामध्ये मोठे बदल घडत आहेत ते आता वेगाने बदलत आहेत. हिमनग वितळून साडेचार मिमीने समुद्राची पातळी वाढत आहे. आपण बदललो नाही तर मनुष्याचे जीवन धोक्यातच नाही तर नष्ट होईल. आधुनिक जीवनशैलीमधील प्रत्येक गोष्ट वातावरणावर परिणामकारक ठरत आहे. वातावरणामध्ये बदल घडविण्याचे काम हे फक्त सरकार आणि इंडस्ट्रीचे नाही तर आपणा प्रत्येकाचे हे काम आहे. छोटया मोठ्या कामातून दिवसागणीक मनुष्य निर्मित कार्बनडायऑक्साईडचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होत आहे. हे उत्सर्जित कार्बनडाय ऑक्साईड जागाच्या वातावरणामध्ये तीनशे वर्षांपर्यंत राहणार आहे. आज, जगामध्ये ५३ टक्के जादा कार्बनडाय ऑक्साईड निर्मित झालेले आहे. यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. सध्या, पृथ्वीचे २.५ डीग्री फेरेनाईट इतके तापमान वाढलेले आहे. वस्तुंच्या अतिरेकी वापरामुळे निर्माण होणाऱ्या तपामान वाढीला लक्ष्मणरेखा तयार केली पाहिजे. पृथ्वी सिमित आहे, सारे संसाधने सिमित आहेत तर तापमानवाढ रोखण्यासाठी आपल्या गरजाही सिमित करणे आवश्यक आहे.

याप्रसंगी, श्रीम इलेक्ट्रीक लिमिटेड इंडस्ट्रीचे एस.आर. जगदाळे यांनी इनर्जी स्वराज फाऊंडेशनला एकावन्न हजार रूपयांची देणगी दिली. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ.गिरीष कुलकर्णी, किर्लोस्कर ऑईल इंजिनचे शरद आजगेकर, आर्किटेक्चर शिरिष बेरी, इश्रेचे प्रमोद पुणगावकर यांची आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये बोलताना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजनीश कामत म्हणाले, हवामान बदलामुळे जगभरात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई, शेतीचे अतोनात नुकसान, अन्नसुरक्षेचा प्रश्न आणि मानवी आरोग्यास धोके निर्माण झाले आहेत. यासाठी आपण आपल्या घराची ज्यापध्दीने काळजी घेतो तशीच काळजी पृथ्वीची आपल्या सभोवतालच्या परिसराची घेतली पाहिजे.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.प्रदीप भास्कर यांनी स्वागत व प्रस्ताविक केले. तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ.अजित कोळेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ.हर्षवर्धन पंडीत यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला उपेंद्र देऊसकर, आर्कि टेक्ट अंजली जाधव, अजय कोरणे, डॉ.एन.एन.शिंदे तसेच इंडस्ट्रीचे पदाधिकारी, विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, पर्यावरणप्रेमी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 2 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

# लोकशाहीर अण्णा भाऊसाठे यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठात एक दिवसीय चर्चासत्र

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन आणि इंग्रजी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर अणा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावरील विशेष एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या सोमवारी (दि. ३) सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या गणित अधिविभाग सभागृहात चर्चासत्र होईल.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई येथील डॉ. बळीराम गायकवाड यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस मुख्य बीजभाषक म्हणून आपले विचार मांडतील. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. यानंतरच्या चर्चासत्रात डॉ. मेघा पानसरे, डॉ. आलोक जत्राटकर आणि डॉ. अंबादास सकट हे सहभागी होतील. या सत्राच्या अध्यक्षपदी डॉ. गिरीष मोरे असतील. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अध्यासनाचे समन्वयक डॉ. अक्षय सरवदे आणि इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी केले आहे.

02 AUG 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक शास्त्रांमध्येही उपयुक्त संशोधन व्हावे

## शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत जि. प. सीईओ, डॉ. जॅस्मिन यांचे मार्गदर्शन

**जनप्रवास : कोल्हापूर**

विज्ञान क्षेत्रांमधील संशोधनाइतकेच सामाजिक शास्त्रांमधील संशोधनही उपयुक्त असून त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी समाजाभिमुख संशोधन करण्यावर भर द्यावा, असे आवाहन कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन यांनी व्यक्त केले. ग्रामीण विकासामध्ये जिल्हा परिषद अत्यंत मूलभूत व महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाद्वारे काल 'जिल्हा परिषदेच्या अभ्यासाची चौकट' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यावेळी प्रमुख साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी डॉ. जॅस्मिन म्हणाल्या, बदलत्या काळात सामाजिक शास्त्रे मागे पडताना दिसत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ पदवीपुरते संशोधन न करता आपल्या संशोधनाचा समाजाला प्रत्यक्ष कसा उपयोग होईल, याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. संशोधनासाठी विषयाची निवड करताना सध्याची सामाजिक गरज काय आहे, हे ओळखूनच विषयांची निवड करावी, जेणेकरून या संशोधनातून समाजाला योग्य दिशा मिळेल. यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेची प्रशासकीय रचना, तिचे प्रत्यक्ष कामकाज आणि कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या वतीने तळागाळातील घटकांसाठी राबवले जाणारे विविध उपक्रम व विकास योजना यावर सविस्तर मांडणी केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन. शेजारी डॉ. प्रकाश पवार आणि डॉ. शार्दुल सेलुकर.

कार्यशाळेला मानव्यविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, भारती पाटील, शार्दुल सेलुकर, संजय सपकाळ, नेहा वाडेकर, दत्तात्रय सावंत यांच्यासह विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी व अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळा समन्वयक डॉ. सुखदेव उंदरे यांनी स्वागत केले. राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. आयेशा अत्तार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय सावंत यांनी परिचय करून दिला, तर डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

**'संशोधनक्षम विद्यार्थ्यांकडून आत्मनिर्भर भारताकडे'**

तत्पूर्वी, कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये जीवनोपयोगी कौशल्ये विकसित करून त्यांची रोजगारक्षमता वाढवणे हे आहे. या धोरणात संशोधनालाही रोजगाराचे महत्त्वपूर्ण क्षेत्र म्हणून स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची संशोधन क्षमता वाढवणे आणि त्यांच्यात संशोधन कौशल्ये विकसित करणे ही आजची गरज आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. सामाजिक समस्या सोडवण्यासाठी विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे यांनी संयुक्त संशोधन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले.

**'गाथा ग्रामविकासाची' मधून उलगडला अभ्यासपूर्ण प्रवास**

कार्यशाळेमध्ये पत्रकार समीर देशपांडे यांनी 'गाथा ग्रामविकासाची-कोल्हापूर जिल्हा परिषदः अनुभव आणि आठवणी' या विषयावर उपस्थितांशी सविस्तर संवाद साधला. ग्रामविकासाच्या अनेक चांगल्या आणि नाविन्यपूर्ण संकल्पना कागदावर अतिशय उत्तमरित्या उतरतात, परंतु त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र तितक्याच ताकदीने आणि प्रभावीपणे होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यांनी गेल्या काही दशकांत बदलत गेलेल्या राजकारणाच्या आणि निवडणुकांच्या स्वरूपावर प्रकाश टाकला. ग्रामीण भागाचा कणा असलेल्या या मराठी शाळांच्या अडचणी सोडवून त्या टिकवणे आणि मजबूत करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्राचार्य डॉ. दिनकर पाटील अध्यक्षस्थानी होते.

0 2 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक शास्त्रांमध्येही उपयुक्त संशोधन होणे आवश्यक: डॉ. जॅस्मिन




**कोल्हापूर/प्रतिनिधी :** विज्ञान क्षेत्रांमधील संशोधनाइतकेच सामाजिक शास्त्रांमधील संशोधनही उपयुक्त असून त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी समाजाभिमुख संशोधन करण्यावर भर द्यावा, असे आवाहन कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन यांनी व्यक्त केले. ग्रामीण विकासामध्ये जिल्हा परिषद अत्यंत मूलभूत व महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाद्वारे काल 'जिल्हा परिषदेच्या अभ्यासाची चौकट' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यावेळी प्रमुख साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

डॉ. जॅस्मिन म्हणाल्या, बदलत्या काळात सामाजिक शास्त्रे मागे पडताना दिसत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ पदवीपुरते संशोधन न करता आपल्या संशोधनाचा समाजाला प्रत्यक्ष कसा उपयोग होईल, याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. संशोधनासाठी विषयाची निवड करताना सध्याची सामाजिक गरज काय आहे, हे ओळखूनच विषयांची निवड करावी, जेणेकरून या संशोधनातून समाजाला योग्य दिशा मिळेल.

यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेची प्रशासकीय रचना, तिचे प्रत्यक्ष कामकाज आणि कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या वतीने तळागाळातील घटकांसाठी राबवले जाणारे विविध उपक्रम व विकास योजना यावर सविस्तर मांडणी केली.

**'संशोधनक्षम विद्यार्थ्यांकडून आत्मनिर्भर भारताकडे'**

तत्पूर्वी, कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये जीवनोपयोगी कौशल्ये विकसित करून त्यांची रोजगारक्षमता वाढवणे हे आहे. या धोरणात संशोधनालाही रोजगाराचे महत्त्वपूर्ण क्षेत्र म्हणून स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची संशोधन क्षमता वाढवणे आणि त्यांच्यात संशोधन कौशल्ये विकसित करणे ही आजची गरज आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. सामाजिक समस्या सोडवण्यासाठी विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे यांनी संयुक्त संशोधन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले.

**'गाथा ग्रामविकासाची'मधून उलगडला अभ्यासपूर्ण प्रवास**

कार्यशाळेमध्ये ज्येष्ठ पत्रकार समीर देशपांडे यांनी 'गाथा ग्रामविकासाची- कोल्हापूर जिल्हा परिषदः अनुभव आणि आठवणी' या विषयावर उपस्थितांशी सविस्तर संवाद साधला. ग्रामविकासाच्या अनेक चांगल्या आणि नाविन्यपूर्ण संकल्पना कागदावर अतिशय उत्तमरित्या उतरतात, परंतु त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र तितक्याच ताकदीने आणि प्रभावीपणे होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यांनी गेल्या काही दशकांत बदलत गेलेल्या राजकारणाच्या आणि निवडणुकांच्या स्वरूपावर प्रकाश टाकला. ग्रामीण भागाचा कणा असलेल्या या मराठी शाळांच्या अडचणी सोडवून त्या टिकवणे आणि मजबूत करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्राचार्य डॉ. दिनकर पाटील अध्यक्षस्थानी होते.

कार्यशाळेला मानव्यविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. भारती पाटील, डॉ. शार्दुल सेलुकर, डॉ. संजय सपकाळ, डॉ. नेहा वाडेकर, डॉ. दत्तात्रय सावंत यांच्यासह विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी व अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळा समन्वयक डॉ. सुखदेव उंदरे यांनी स्वागत केले. राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. आयेशा अत्तार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय सावंत यांनी परिचय करून दिला, तर डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 2 AUG 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ८६८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आजअखेर ८६८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत सुरू आहेत. शनिवारी मास्टर ऑफ आर्किटेक्चर अभ्यासक्रमाची वर्णनात्मक पद्धतीची परीक्षा एका केंद्रावर शांततेत पार पडली. परीक्षेला ९ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठाने बी.कॉम. बी. एफ. एस. अँड आय. (सेमिस्टर ३ व ४) या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत.

परीक्षेदरम्यान गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विद्यापीठाने भरारी पथके नियुक्त केली आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

0 2 AUG 2026

जनप्रवास

# विविध अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. १ एप्रिल पासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. ३१ जुलैरोजी ६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले असून आजअखेर ८६६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. तसेच शनिवारी १ ऑगस्टरोजी एका अभ्यासक्रमाची परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने एका परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडली. परीक्षेसाठी ९ विद्यार्थी उपस्थित होते. शनिवारी विविध २ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले असून आजअखेर ८६८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले.